महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/महाडीबीटी २०२०-२१/२०२१/ 233                दिनांक : १३.०१.२०२१

14 JAN 2021

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित संस्था
पुणे विभाग.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील महाडीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांच्या कार्यवाहीबाबत..

संदर्भ : १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र जा.क्र. १८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/२०२०/३७७ दिनांक ०३.१२.२०२०.
२) या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. तंशिविकापु/विवि/महाडीबीटी२०२०-२१/२०२०/४८ दिनांक ०५.०१.२०२१.
३) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र जा.क्र. १८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/विकापु/२०२१/१३ दिनांक १३.०१.२०२१.

उपरोक्त विषयास अनुसरुन, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता, महाडीबीटी पोर्टल दिनांक ०३.१२.२०२० पासून शासनाकडून सुरु करण्यात आलेले आहे. संदर्भ क्रमांक २ मधील परिपत्रकान्वये या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्थांना, महाडीबीटी पोर्टलवरील योजनांच्या लाभासाठी लवकरात लवकर, विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन घेण्याबाबत व योजनेबाबतच्या आवश्यक सूचना देण्यात आल्या होत्या.

दिनांक ०८.०१.२०२१ रोजीच्या डीबीटी डॅशबोर्डनुसार तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविल्या जाणा-या तीन योजनांसाठी या विभागीय कार्यालयांतर्गत एकूण ९,४२७ एवढे अर्ज विद्यार्थ्यांकडून भरण्यात आलेले आहेत. एक ते दिड महिना उलटून सुध्दा प्राप्त अर्जांची संख्या अतिशय कमी आहे. तरी या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त येणा-या सर्व संस्थांच्या संस्थांप्रमुखांना पून्हा एकदा सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांचे संस्थेतील सर्व पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांबाबत मार्गदर्शन करुन डीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज प्राधान्याने भरुन घेण्यात यावे. तसेच संबंधित संस्थांनी संस्थेच्या लॉगीन आयडीमध्ये प्राप्त होणारे ऑनलाईन अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या अटी व शर्तीनुसार अर्जांची तपासणी (मंजूर / नामंजूर) करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्याची कार्यवाही प्राधान्याने करावी. जर कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहीला तर याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे